दैनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • शुक्रवार दि.२४ एप्रिल २०२६ • अंक-९३ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

## शरद पवार यांना रुग्णालयातून डिस्चार्ज

**मुंबई–** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांची प्रकृती पूर्णपणे स्थिर असून, नियमित वैद्यकीय तपासणीनंतर ते आता आपल्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी विश्रांती घेत आहेत. सोमवारी त्यांना मुंबईतील ब्रीच कॅण्डी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर उपचार झाल्यानंतर आज त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे.शरद पवार यांना सोमवारी सकाळी प्रकृती अस्वास्थेमुळे ब्रीच कॅण्डी रुग्णालयात नेण्यात आले होते. ही तपासणी पूर्णपणे 'रुटीन चेकअप'चा भाग होती. डॉक्टरांनी त्यांच्या सर्व आवश्यक चाचण्या केल्या असून त्याचे अहवाल सकारात्मक आले आहेत. तथापि, वाढते वय आणि सततचे दौरे यामुळे येणारा थकवा लक्षात घेता, डॉक्टरांनी त्यांना काही काळ सक्तीची विश्रांती घेण्याचा आणि प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे.

# सुनेत्रा पवार अन् अक्षय कर्डिलेंचा विजय निश्चित-नवनाथ बन

**मुंबई (वृत्तसंस्था)**

निवडणूक आयोगावर कोणत्याही पक्षाचा झेंडा नाही, पण उबाठा गटाच्या कार्यालयावर काँग्रेसचा झेंडा दिसून येत आहे. उबाठा काँग्रेसची चाकरी करत आहे, त्यांची गुलामी करत आहे. उबाठा गटाच्या शिल्लक कार्यालयावर काँग्रेस झेंडा आणि तिथून काँग्रेस विचार पसरवण्याचे काम सुरू आहे, हेच उद्धव ठाकरे आणि संजय राऊतांचे धोरण झाले आहे, असे भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी म्हटले आहे.नवनाथ बन म्हणाले की, बारामती आणि राहुरीमध्ये महायुतीचे दोन्ही उमेदवार प्रचंड बहुमताने निवडून येतील, जनता महायुतीसोबत आहे. अजित पवार यांच्या अपघातानंतर पोटनिवडणूक घेण्याची वेळ आली आहे. बारामतीकर हे सुनेत्रा पवार यांच्या पाठिशी आहेत. तिथे मविआने जे सहकार्य केले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानतो. राहुरीमध्ये जनता महायुतीच्या बाजून आहे तिथे अक्षय कर्डिले यांचा विजय निश्चित आहे.

नवनाथ बन म्हणाले की, बारामतीमध्ये पवार विरुद्ध पवार सामना व्हावा ही रोहित पवार यांची इच्छा आहे. कारण ते स्वत:ला महाराष्ट्राचे स्वयंघोषित मोठे नेते समजतात. त्यांना वाटते की महाराष्ट्रात शरद पवार यांच्यानंतरचा बडा नेता मीच आहे. म्हणून प्रत्येक मुद्द्यावर ते भाष्य करत असतात. अजित पवार असल्यापासून रोहित पवार बारामती आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. २०२९ मध्येही त्यांची डाळ शिजणार नाही. बारामती अजित पवारांच्या वारसाकडेच असणार हे रोहित पवार यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

नवनाथ बन म्हणाले की, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये इंडिआ आघाडीतील पक्षांचा पराभव होत असल्याने संजय राऊत यांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. तिथली जनता ममता बॅनर्जी यांच्या दहशत जुगारत मतदानासाठी बाहेर पडत आहे. तिथे भाजपची सत्ता येणार आहे. म्हणून संजय राऊत हे कधी संविधान तर कधी निवडणूक आयोगावर शंका घेणार आहेत. तामिळनाडूमधील जनता स्टॅलिन यांना वैतागली आहे. तर पश्चिम बंगालमधील जनता ममता बॅनर्जी यांना वैतागली आहे. त्यामुळे यंदा तिथे भाजपचीच सत्ता येणार आहे.



# पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये कोटयावधींचा भष्ट्राचार?

## कर्मचारी वेतन आयोगापासून वंचित, माजी सभापती तुपात अनधिकृत दुकानदारांकडून रोज ७० ते ८० हजाराची वसुली?

**पनवेल । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील बहुचर्चित व श्रीमत मार्केट यार्ड म्हणून प्रसिद्ध असलेल्या पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीत कोट्यवधीचा भष्ट्राचार झाल्याचे उघड झाले आहे. या संदर्भात आवाज उठविण्याठी मार्केट यार्ड कर्मचाऱ्यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे.

पनवेल मार्केट यार्डच्या संपूर्ण अनियमित कारभाराचे व भष्ट्राचाराचे प्रकरण उघडकीस आणले आहे. मिळालेला माहिति नुसार मार्केट यार्डच्या नांवे १५ एकर पेक्षा जास्त जागा असून कोटयावधीची मालमत्ता आहे. प्रदीर्घ काळ सदस्य राहिलेल्या माजी सभापतीच्या कारकिर्दीत सुमारे ७ ते ९ कोटी रुपयांचा भष्ट्राचार केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यात प्रकाश नाईक यांचेही नाव समोर येत असायचे समजते. त्यांच्या मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

पनवेल कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये अनधिकृत ८२ तरपट, ओटे उभारून ते १५ लाखांना विकून ५० हजारची पावती देवून मोठ्या रक्कमेवर डल्ला मारल्याचे समजते. नवी मुंबईतील वाशी मार्केटमध्ये अनधिकृत व्यापाऱ्यांवर दंडाचा बडगा उगारला जात असताना, शेजारील पनवेल कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मात्र उलटी गंगा वाहत आहे. नियमांचे पालन करणाऱ्या आणि रीतसर गाळे विकत घेणाऱ्या व्यापाऱ्यांची गळचेपी करून, प्रशासनाच्या आशीर्वादाने अनधिकृत टोपलीवाल्यांचे 'मल्टिप्लेक्स' थाटले जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.





**पावतीचा खेळ की भ्रष्टाचाराचा 'मेळा'? दररोज ७० ते ८० हजार रुपये कोणाच्या खिशात ?**

पनवेल मार्केट यार्डात ज्यांनी रीतसर लाखो रुपये मोजून ओटे किंवा गाळे घेतले आहेत, मात्र, त्यांच्याच दुकानासमोर आज अनधिकृत टोपल्या, कॅरेट आणि स्टॉल्सचा विळखा पडला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या अतिक्रमणांवर कारवाई करण्याऐवजी बाजार समितीचे कर्मचारी त्यांच्याकडून

दररोज ६०० रुपये अधिकृतपणे वसूल केले जात आहेत असल्याचे एक व्यापाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. पनवेल मार्केट यार्डात नाममात्र

'पावती' फाडत आहेत. या वसुलीच्या आड मोठा 'काळाबाजार' सुरू असून, गोळा होणारा पैसा नेमका समितीच्या तिजोरीत जातो की कोणाच्या खासगी खिशात? हा आता चर्चेचा विषय ठरला आहे.

**शौचालय गायब, रस्ते गायब तिथे आले गाळे पण त्याचा हिशोबच नाही**

मार्केटमध्ये येणारे ग्राहक आणि राबणाऱ्या माथाडी कामगारांच्या सुविधेसाठी असलेल्या सार्वजनिक शौचालयांवरही डल्ला मारण्यात आला आहे. मोक्याच्या ठिकाणी असलेली ही शौचालये चक्क तोडून तिथे 'व्हीआयपी' गाळे उभारण्यात आले आहेत. स्वच्छतेच्या सुविधेचे व्यापारीकरण करून हे गाळे नेमके कोणाच्या फायद्यासाठी बांधले गेले? हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

**संशोधनाचा विषय: 'सरकारी' किती आणि 'खासगी' किती?**

पनवेल मार्केटमध्ये नक्की अधिकृत गाळे किती आणि कागदोपत्री नोंद नसलेले 'लाडके' गाळे किती, याची गणती करणे आता संशोधकांचे काम झाले आहे. इमारती पाडून नवीन रचनेच्या नावाखाली मोक्याच्या जागांचे जे वाटप झाले, त्यामागे 'मोठ्या रक्कमेची' देवाणघेवाण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मार्केट यार्ड मध्ये काही एखादी स्पोटक घटना झाली तर व्यापारी व नागरिकांना सुरक्षित बाहेर पडता यावे म्हणून मार्केट मध्ये ठिकठिकाणी रस्ते ठेवले होते. त्या रस्त्यांच्या जागेवर गाळे बांधून ते निमुळते केले आहेत. त्यामुळे एकादी घटना घडली तर चेंगराचेंगरीत मोठी मनुष्य हानी होणार आहे. मार्केट यार्डमध्ये काटे उभारण्यात आले आहेत. त्या जागेवर गाळे बांधण्याचा कुटिल डाव बाजार समितीने आखला असल्याचे समजते.

**शाळेच्या जागेवर गाळे बांधणार ?**

मार्केट यार्डने व्यापारी आणि येथील झोपडपट्टीतील मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून मार्केटला लागून असलेल्या इमारतीमध्ये रयत शिक्षण संस्थेची न्यू इंग्लिश स्कूल म्हणून शाळा सुरू केली सुरुवातीला या शाळेतील शिक्षकांना पगार मार्केट यार्ड देत होता. आता त्या शाळेची इमारत पाडून जागेवर गाळे बांधण्याचा विचार बाजार समिती करत आहे. या १ ते १० पर्यंत विद्यार्थांना मार्केट यार्डच्या पत्रा टाकलेल्या जागेत कोंडून शिक्षण दिले जात आहे. उष्णतेचा दाह एवढा भयंकर आहे की काही मुलांना त्याचा त्रास होत आहे.

# संजय गायकवाड यांचे वादग्रस्त विधान: 'शिवाजी कोण होता' पुस्तकाच्या प्रकाशकाला शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट)चे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता' या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत प्रकाशक प्रशांत आंबी यांना फोनवरून अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. व्हायरल झालेल्या ऑडिओ क्लिपमध्ये गायकवाड यांची अभद्र भाषा स्पष्ट ऐकू येत आहे.

या संभाषणात आमदार गायकवाड म्हणाले, शिवाजी महाराजांना एकेरी बोलणारा गोविंद पानसरे कोण? त्याला भेटायला वर जायचंय का? ... तुझी जीभ छाटून टाकीन, घरात घुसून मारेल... अशा शिवराळ शब्दांत त्यांनी प्रकाशकाला धमकावले.

२१ एप्रिल २०२६ रोजी बुलढाण्यातील एका लग्न समारंभात प्रकाशक प्रशांत आंबी यांनी हे पुस्तक वाटले. गायकवाड यांच्या पत्नीला हे पुस्तक भेट मिळाल्यावर त्यांनी रात्री उशिरा प्रकाशकाला फोन केला. पुस्तकातील छत्रपती शिवाजी महाराजांचा 'एकेरी उल्लेख' (शिवाजी कोण होता) यावर त्यांचा तीव्र आक्षेप होता. त्यांनी पुस्तक प्रकाशित करण्याचे धाडस कसे केले, असा सवाल करत अभद्र भाषेचा वापर केला.

प्रकाशक प्रशांत आंबी यांनी संयम राखत गायकवाड यांच्याशी संवाद साधला. मात्र, आमदारांच्या धमकीमुळे त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. या घटनेने महाराष्ट्रात मोठी खळबळ उडवली असून, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर हल्ला






असल्याची टीका होत आहे.

**मेधा पानसरे यांचा सडेतोड प्रत्युत्तर**

या वादावर कॉम्रेड गोविंद पानसरे यांची सून मेधा पानसरे यांनी गुरुवारी कोल्हापूर येथे माध्यमांशी बोलताना तीव्र निषेध व्यक्त केला. त्यांनी म्हटले, आमदार संजय गायकवाड यांनी ज्या पद्धतीची भाषा वापरली आहे, त्याचा मी तीव्र निषेध करते. छत्रपती शिवाजी महाराज हे सौजन्यशील, न्यायप्रिय आणि रयतेचा राजा म्हणून ओळखले जातात. त्यांचा वारसा सांगत अशी भाषा करणारे शिवरायांचा कोणता वारसा पुढे नेत आहेत?

मेधा पानसरे यांनी पुढे सांगितले की, हे पुस्तक १९८० च्या दशकात प्रकाशित झाले असून, लाखो प्रती वाटल्या गेल्या आहेत. कॉम्रेड पानसरे यांचा विचार मारता येत नाही. त्यांच्यापाशी दुसरा तुल्यबल विचार नाही, म्हणून अशा पद्धतीचे वक्तव्य केले जाते. गायकवाड यांनी पुस्तक वाचावे, मग वक्तव्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

त्यांनी पुस्तकाच्या अधिक प्रती छापण्याची घोषणा करत गायकवाड यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणीही केली. आम्ही वकिलांचा सल्ला घेत आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. हा वाद पुन्हा एकदा 'शिवाजी कोण होता' पुस्तकाभोवतालचा दीर्घकाळ चालत असलेला वाद पुन्हा तापवणारा ठरला आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात अभद्र भाषा आणि धमक्यांचा मुद्दा चर्चेत आला आहे.

# विकास कामांची दैना रस्ते खोदायला परवानगी देता मग रस्ते सुरळीत का केले जात नाही

## विकास कामांचा बोजवारा खोदाईच्या नावावर जनतेची दैना

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरासह उपनगरात विकास कामांच्या नावावर रोडवर अनेक ठिकाणी कामे सुरू आहे हे कामे तर करतात आणि खोदकाम केलेल्या ठिकाणी रस्ते सुरळीत केले जात नाही ठेकेदारांना दिलेली कामे योग्य पध्दतीने अर्थपूर्ण होते की नाही यावर महापालिकेचे अधिकारी पहायला त्यावरचं नाही वाटेल तसा कारभार सुरू आहे बाणेर,बालेवाडीत दोन महिन्या पासून अनेक कामांचे खोदाईंचे कामे सुरू आहे हे अनेक ठिकाणी खोदकाम झाल्या नंतरही रस्ते पुर्वस्थितीत गेल्या दोन महिन्यांपासून झालेले नाही यावर कोणाचेही नियंत्रण नाही ठेकेदार हे नगरसेवकांचे जवळचे असल्या कारणाने यावर कोणीही लक्ष देत नसल्या कारणाने वाटेल तसा कारभार सुरू आहे यात जनतेला चालण्या करिता पदपथच राहत नाही आणि वाहतूक चालकांना याचा सतत त्रास होत असल्या कारणाने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे महापालिका विकास कामा करिता ठेकेदारांना परवानगी देते मग राहलेले कामे तातडीने का केली जात नाही अनेक ठिकाणी रोडवर मातीचे ,दगडांचे,खडींचे ठिगारे साचलेले





असतांनाही यावर कारवाई केली जात नाही खोदाई झाल्या नंतर रोड पुर्वस्थितीत का करण्यात येत नाही या ठेकेदारांच्या मनमानी कारभाराला लगाम कोण लावणार आहे

।।। ठेकेदार राजकारण्यांचे मग कारवाई कशी होणार ।।।

बाणेर ,बालेवाडी अशा अनेक ठिकाणी रोड खोदून ठेवलेले आहे एकतर पावसाळा जवळ येत आहे मग रोड पुर्वस्थितीत कधी आणणार अनेकांचे मायाजालात हात गूंतलेले असल्या कारणाने अधिकारी सुध्दा यावर लक्ष देत नसल्याचे दिसत आहे दोन ते तीन महिने झाले तरी खोदाई नंतर रोड पुर्वस्थितीत कधी आणणार अनेक ठिकाणी कामांची परवानगी नसतांनाही खोदाईचे कामे करण्यात आलेली आहे याची चौकशी तर होणारचं नाही कारण जे परवानगीने कामे सुरू आहे यांनीच तीन तीन महिन्या नंतरही रोड पुर्वस्थितीत केलेला नाही या कामावरुन कोणाचेही नियंत्रण नसल्या कारणाने याचा भोग जनतेला भोगावा लागत आहे.

# रिपब्लिकन सेनेचे प्रकाश खंडागळे यांचा शेकडो कार्यकर्त्यांसह रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षात जाहीर प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

गटबाजी संपवून एकसंघ रिपब्लिकन पक्ष उभारण्याच्या केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. रिपब्लिकन सेनेचे मुंबई प्रदेश अध्यक्ष प्रकाश खंडागळे यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह आठवले यांच्या नेतृत्वातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) या पक्षात जाहीर प्रवेश केला.रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी अधिकृत घोषणा करत खंडागळे व त्यांच्या समर्थकांचे स्वागत केले. आठवले म्हणाले, महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट आहेत, पण देशभरात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांत मी एकसंघ रिपब्लिकन पक्ष पोहोचवला आहे. नवे गट काढण्यापेक्षा विद्यमान छोटे-मोठे गट विलीन करून एक मजबूत पक्ष उभा करावा, असा आवाहन करताच महाराष्ट्रातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

यापूर्वी महाराष्ट्र पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष मिलिंद सुर्वे यांनीही आपला गट आठवले यांच्या पक्षात विलीन केला होता. आठवले यांनी विश्वास व्यक्त केला की, राज्यातील अनेक छोटच्या रिपब्लिकन संघटना लवकरच एकसंघतेच्या हेतूने पक्षात सामील



होतील.

प्रकाश खंडागळे यांनी प्रवेशावेळी सांगितले, वेगळा नवीन गट काढून गटबाजी वाढवण्यापेक्षा रामदास आठवले यांच्या नेतृत्वावर पूर्ण विश्वास ठेवून रिपब्लिकन पक्षात प्रवेश करत आहोत. एकसंघ रिपब्लिकन पक्ष मजबूत व्हावा हाच उद्देश आहे.

यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे, राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खांबलकर, मुंबई कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड, मुंबई सरचिटणीस विवेक पवार, जिल्हा अध्यक्ष प्रकाश जाधव, दयाळ बहादुर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महिलांचाही मोठा सहभाग होता. ज्योती यादव, निविदीता शेलार, पुष्पा भल्लाल, रोहिणी शिरपूरकर, नंदिनी शेलार, वंदना जाधव, स्मिता गौरव, रजनी विश्वकर्मा, दिव्या बल्लाळ, आशा कसबे, छाया पगारे, रोशनी पाठक, रागिणी संगारे आदी महिलांनीही पक्षात प्रवेश केला.

# नवी मुंबईत न्यूईरा हॉस्पिटलच्या आधुनिक ट्रॉमा केअर सेंटरचा शुभारंभ

## रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्सचे वितरण

**पनवेल । प्रतिनिधी**

रस्ते अपघातातील जखमींवर गोल्डन अवरमध्ये प्राण वाचविणारी उपचार यंत्रणा म्हणजेच ट्रॉमा केअर सेंटरच्या हे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी खूप गरजेची आहे. ही बाब लक्षात घेता वाशीच्या न्यूईरा हॉस्पिटलने नव्याने एक पॉली ट्रॉमा केअर सेंटर सुरू केले आहे. उपचारासाठी होणारा विलंब कमी करण्यासाठी आणि त्वरित उपचार मिळवून देण्यासाठी हे केंद्र सज्ज असून यामुळे रुग्णांना योग्य वेळी योग्य उपचार मिळण्यास मदत होते.

सेंटरच्या शुभारंभ प्रसंगी श्री. संजय येनपुरे - आयपीएस, सह पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांची प्रमुख उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. संजय धार (संचालक, ऑर्थोपेडिक्स विभाग),डॉ. विनोद विज (प्लास्टिक आणि कॉस्मेटिक सर्जन),डॉ. सुनील कुट्टी( न्युरोसर्जन),डॉ. चंद्रशेखर टी(क्रिटिकल केअर मेडिसिन),डॉ. मनीष पेंडसे (फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट),डॉ. निशांत तावडे(इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट),डॉ. राम खरे(जीआय, लॅप्रोस्कोपिक आणि रोबोटिक सर्जरी),न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता उपस्थित होते.




याठिकाणी ढीळरसश (ट्रायज) ही आपत्कालीन स्थितीत रुग्णांच्या स्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांना प्राधान्यक्रमाने उपचार देण्याची वैद्यकीय प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अपघात, स्ट्रोक, गंभीर दुखापतींसारख्या प्रकरणांमधील रुग्णाला सर्वात आधी प्राधान्य दिले जाते आणि प्रतीक्षा न करता त्यांचे व्यवस्थापन केले जाते. या केंद्राला चोवीस तास उपलब्ध असलेल्या प्रशिक्षित आपत्कालीन पथकाचे, तसेच अस्थिरोग, सर्जन, मज्जासंस्थेच्या शस्त्रक्रिया, भूलविकार तज्ज्ञ, अतिदक्षता विभाग आणि फिजिओथेरपी तज्ञांचा समावेश आहे.

शहरातील वाढत्या वाहतूक व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरक्षेला चालना देण्यासाठी न्यूईरा हॉस्पिटलतर्फे नवी मुंबई पोलिसांना २०० बॅरीकेट्स देण्यात आले.वाशी पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या उपस्थितीत हे बॅरीकेट्स सुपूर्द करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी व रुग्णालयाचे प्रतिनिधी उपस्थित होते. वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी आणि रस्त्यांवरील शिस्त राखण्यासाठी या बॅरीकेट्सचा उपयोग केला दाणार आहे.

डॉ. सुनील कुट्टी (संचालक, न्यूरोसर्जन- ब्रेन ण्ड स्पाईन, न्युईरा हॉस्पिटल) म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीत, रुग्ण आणि त्यांचे कुटुंबीय बऱ्याचदा अतिशय तणावाखाली असतात. अशावेळी वेळ व दवडता उपचार त्वरित सुरू व्हावेत आणि ते सुरळीतपणे दिले जावेत, हे सुनिश्चित करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

न्यूईरा हॉस्पिटलचे उपाध्यक्ष आणि सीईओ डॉ. माताप्रसाद बी गुप्ता म्हणाले, आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णांसाठी एक विश्वासार्ह आधार व्यवस्था निर्माण करण्यास आम्ही सज्ज आहोत. याठिकाणी रुग्णांना कोणत्याही गोल्डन अवरमध्ये उपचार मिळतील. हे 'ट्रॉमा केअर सेंटर' रुग्णांना दिलासा,पुरेपुर आराम, सुरक्षितता आणि आजारातून लवकर बरे करण्याची शाश्वती देते.

# हनुमंतराव पाटील एक आदर्श व्यक्तिमत्व ५३ रुग्णांना दिले जीवणदान

**चाकुर । प्रतिनिधी**

अजनसोंडा (बु:) येथील लोकप्रिय सामाजिक कार्यकर्ते माजी जिल्हा परिषद सदस्य व माजी सरपंच श्री हनुमंतराव पाटील यांच्या ५३ व्या वाढदिवसानिमित्त गावातील व गाव खेड्यातील त्यांच्या ५३ चाहत्यांनी रक्तदान करून ५३ रुग्णांना जीवनदान दिले ही एक अभिमानास्पद घटना म्हणावी लागेल एका खेडेगावातून एकाच दिवशी ५३ रक्तदाते मिळणे दुरापस्त असते परंतु अजनसोंडा (बु:) येथील तरुणांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून देऊन एक आदर्श घालून दिला आहे हनुमंतराव पाटील यांच्या वर असंच तरुणांचे प्रेम असल्यामुळे सकाळी दहा ते संध्याकाळी पाच पर्यंत रक्तदाते तरुणांशी झुंबड उडाली होती हनुमंतराव पाटील एक आदर्श व्यक्तिमत्व असून त्यांचा संपूर्ण ओढा गावातील व खेड्यापाड्यातील गरीब जनतेच्या कल्याणा कडे असतो द्वेष हा त्यांच्या खिजगणतीत नसतो .त्यामुळे गोरगरिबांचे प्रेम त्यांच्यावर अधिक



असते हे रक्तदाना वरून दिसून आलं आहे म्हणून ते आदर्श व्यक्ती महत्त्वाच्या लायक आहेत असंच म्हणावे लागेल पुढिल वाटचालिस हार्दिक शुभेच्छा व त्यांना उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा

**-व्यंकटेश काकनाटे ;कला शिक्षक व साहित्यीक लेखक अजनसोंडा (बु:)**

# बाणेर,बालेवाडी मधील रस्त्यांची अवस्था



**पुणे । रमेश जयस्वाल -विकासकामांच्या नावावर जनतेची दैना रोडवर खोदाईंचे कामे केली जातात मग रोड कामानंतर पुर्वस्थितीत कधी करणार**

# दिवा मुंब्रा परिसरातील अनधिकृत नळसंयोजनावर कारवाई; एकूण १०९ नळसंयोजने खंडीत

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत सर्व्हिस सेंटर व अनधिकृत नळसंयोजन खंडीत करुन पाणीपुरवठा बंद करण्याची मोहिम आयुक्त सौरभ राव यांचे आदेशान्वये सुरु करण्यात आली आहे. दिनांक १७ ते २२ एप्रिल २०२४ दरम्यान दिवा, मुंब्रा परिसरातील एकूण १०९ अनधिकृत नळ संयोजने खंडीत करण्यात आली आहे. दिवा साबेबाव कोकण रत्न दिवा महोत्सव मैदानाच्या बाजूला १५० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील ट इंची व्यासाचे १८ व ठ इंची व्यासाचे ०४ अशी एकूण २२, वेताळपाडा येथील १०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील ट इंची व्यासाचे एकूण ११, ग्लोबल स्कूलच्या पाठीमागे २०० जलवाहिनीवरील ठ इंची व्यासाचे ०४ अशी एकूण ०९ , कोकण रत्न, दिवा महोत्सव मैदानाच्या बाजूला, साबेगाव १५० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील ट इंची व्यासाचे एकूण ०५, मुंब्रा ठाकूरपाडा येथील नाल्याच्या बाजूला ट इंची व्यासाची एकूण ०६ नळसंयोजने खंडित करण्यात आली असून पाणीपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

वारेकर स्कूल जवळ, मुंब्रा देवी कॉलनी १०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील ट इंची व्यासाची एकूण ०६, साबे गाव येथील नळसंयोजन खंडीत करुन पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. तसेच येथील १०० मी. पी.व्ही.सी पाईप व १ मोटर जप्त करण्यात आली आहे. साबेगाव रेल्वे ट्रॅकच्या बाजूला ३०० मी.मी व्यासाच्या जलवाहिनीवरील ट इंची व्यासाचे एकूण ५० नळ संयोजन खंडित करण्यात आली असून ११५० मी.पी.व्ही.सी पाईप व ०२ मोटर जप्त करण्यात आल्या आहे. संपूर्ण शहरात अशा प्रकारची कारवाई सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# सिडकोतर्फे नवी मुंबईमध्ये एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क विकसित करण्यात येणार प्राथमिक टप्प्यासाठी स्वारस्य अभिव्यक्ती (Expression of Interest) आमंत्रित

## नवी मुंबईमध्ये नियोजित भव्य एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क प्रकल्पाच्या प्राथमिक टप्प्याकरिता सिडकोकडून स्वारस्य अभिव्यक्ती आमंत्रित

### लॉजिस्टिक्स क्षेत्राला चालना : सिडकोतर्फे नवी मुंबईमध्ये भव्य एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्कच्या प्राथमिक टप्प्याचे नियोजन


**नवी मुंबई । प्रतिनिधी**

भारतामधील लॉजिस्टिक्स क्षेत्र ई-कॉमर्स, उत्पादन आणि जागतिक व्यापाराच्या वाढीमुळे वेगाने विस्तारत आहे. या पार्श्वभूमीवर, नवी मुंबई एक प्रमुख लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून पुढे येत आहे- अनेक वर्षांची संकल्पना आता प्रत्यक्षात आकार घेत आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांसोबत असलेले सान्निध्य तसेच मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, प्रस्तावित मल्टी-मोडल कॉरिडॉर तसेच डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांमुळे लाभलेल्या उत्कृष्ट कनेक्टिव्हिटीमुळे नवी मुंबई एक प्रमुख लॉजिस्टिक्स हब म्हणून उदयास येत आहे.या धोरणात्मक संधीचा लाभ घेण्यासाठी सिडकोने पुष्पक नोडमधील चिर्ले गावाजवळ सुमारे ३७४ हेक्टर जमीन एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्क (आयएलपी) विकसित करण्यासाठी राखीव ठेवली आहे. या प्रकल्पांतर्गत विकसित होणाऱ्या क्षेत्रावर आवश्यक पायाभूत सुविधा, सामाजिक सुविधा, सामायिक सुविधा आणि उपयुक्तता जाळ्यांचा समावेश असेल.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मजबूत प्रादेशिक कनेक्टिव्हिटी यांसारख्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांसह नवी मुंबईचे मोक्याचे स्थान, या बळावर, नवी मुंबई हे लॉजिस्टिक्स व संबंधित उद्योगांसाठी नैसर्गिक केंद्र म्हणून आकार घेत आहे. एकात्मिक लॉजिस्टिक्स पार्कच्या विकासाद्वारे, सिडको कार्यक्षम मालवाहतूक सुलभ करणारी, गुंतवणूक आकर्षित करणारी आणि आर्थिक विकासाला चालना देणारी भविष्याभिमुख परिसंस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. प्राथमिक टप्पा हा या क्षमतेला चालना देत नवी मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून स्थापित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**विजय सिंघल* उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

या प्रकल्पासाठी जमीन वाटप, विकास आणि वितरण हे महाराष्ट्र शासनाच्या एमआयडीसी पास-थ्रू धोरणानुसार करण्यात येणार आहे. यासाठी सविस्तर मास्टर प्लॅन तयार करण्यात आला असून संपूर्ण क्षेत्र सात लॉजिस्टिक्स झोनमध्ये विभागण्यात आले आहे. सर्व भूखंडांना सुलभ जोडणी मिळावी यासाठी ४५ मीटर आणि ३० मीटर रुंदीच्या रस्त्यांचे




प्राथमिक जाळे प्रस्तावित करण्यात आले आहे. प्राथमिक टप्प्यात, सिडकोने स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे लँड पार्सल एल-१ मधील सुमारे ७२ हेक्टर (१७९.२९ एकर) क्षेत्रातील १२ भूखंडांसाठी स्वारस्य अभिव्यक्ती (एजख) आमंत्रित केली आहे. या प्रकल्पासाठी रस्ते, पाणीपुरवठा व्यवस्था, मलनिस्सारण जाळे आणि पावसाच्या पाण्याचा निचरा यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधा सिडकोकडून विकसित करण्यात येतील.

निवड प्रक्रियेनंतर, यशस्वी अर्जदार आणि सिडको यांमध्ये सामंजस्य करार (एमओयू) करण्यात येईल, ज्यामध्ये संबंधित भूखंडाच्या शुल्क भरणा आणि अधिग्रहणासंबंधी अटी नमूद असतील. महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण आणि त्यातील पुढील अद्ययावतीकरणांनुसार या प्रकल्पांतर्गत लॉजिस्टिक्स आणि संबंधित लाइट इंडस्ट्रीज, वेअरहाउसिंग, लॉजिस्टिक्स पार्क, कंटेनर फ्रेट स्टेशन, इनलँड कंटेनर डेपो आणि इतर पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील.

हा उपक्रम नवी मुंबईला राष्ट्रीय स्तरावरील लॉजिस्टीक पार्क म्हणून अधिक बळकटी देण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत असून कार्यक्षम, एकात्मिक आणि भविष्याभिमुख मालवाहतूक पायाभूत सुविधा विकसित करण्यास चालना देणारा आहे. यासोबतच, सिडकोतर्फे एज्युकेशन सिटी, मेडिसिटी, स्पोर्ट्स सिटी आणि एंटरटेनमेंट अरेना यांसारख्या महत्त्वाच्या सामाजिक पायाभूत प्रकल्पांची उभारणी करण्यात येत असून त्यामुळे या प्रदेशाचा एकूण विकास अधिक सक्षम होणार आहे. प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि पूरक पायाभूत सुविधांच्या बळावर हे सर्व प्रकल्प नवी मुंबईला एक सर्वसमावेशक शहरी व आर्थिक केंद्र म्हणून घडवतील, विकासाला गती देतील आणि शहराला नव्या उंचीवर नेतील.

# ठाण्यात एस टीची शिवशाही एसी बस भीषण आगीत जळून खाक

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे स्टेशन जवळील सॅटीस उड्डाणपुलावर दुपारी १:२८ वाजताच्या सुमारास महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची शिवशाही एसी बस क्रमांक- चक ०९ एच् ९९४२, (चालक श्री. संतोष किसन गवळी, वाहक - श्री. मिलिंद सोनावणे, मार्ग - स्वारगेट ते वसई.) या बसला ठाणे रेल्वे स्टेशन बस स्थानक येथून वसईला जाताना सॅटिस ब्रिजवरती आग लागली होती. प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय. एम. तडवी, ठाणे नगर पोलीस कर्मचारी, ठाणे नगर वाहतूक पोलीस कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०१-फायर




वाहनासह, ०१-रेस्क्यू वाहनासह, ०१-वॉटर टँकर वाहनासह, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१-पिकअप वाहनासह व महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे कर्मचारी उपस्थित होते.सदर आग लागलेली बस ही वसई बस डेपोची असून बस मध्ये स्वारगेट वरून वसईला जाणारे १० प्रवासी व ठाणे येथून ०४ प्रवासी असे एकूण १४ प्रवासी प्रवास करत होते. सदर बसला आग लागताच सर्व प्रवासी व बसचे चालक व वाहक सुरक्षित बसच्या बाहेर आले त्यामुळे अनर्थ टळला परंतू शिवशाही बस पूर्णतः जळून नुकसान झाले आहे. सदर आग लागलेल्या बस मधील डिझेल व ऑइल रस्त्यावरती पसरले होते त्यावरती आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांच्या मदतीने माती पसरविण्यात आली.



**ठाणे : अखेर दिवा शहरातील अनधिकृतपणे लावलेले फ्लेक्स / बॅनर ठाणे महापालिकेच्या दिवा प्रभाग समितीच्या अतिक्रमण विभागाकडून हटविण्यात आले. शहर विद्रुपीकरण करणारे शेकडो अनधिकृत बॅनर हटविण्यासोबत संबंधितावर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. ( फोटो - संतोष पडवळ )**

# नवीन पनवेलमध्ये रेशनिंग दुकानाचा गैरप्रकार; लाभार्थी धान्यापासून वंचित

**पनवेल । प्रतिनिधी**

परिसरातील क्रमांक १६ रेशनिंग दुकानाबाबत गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. स्थानिक लाभार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, दुकानदार लाभार्थ्यांचे अंगठे (बायोमेट्रिक थंब) आणि ओटीपी घेत असला तरी प्रत्यक्षात रेशनिंग धान्याचे वाटप करत नसल्याचा आरोप आहे. त्यामुळे अनेक गरजू नागरिक धान्यापासून वंचित आहेत. लाभार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च महिन्यातही अंगठा घेऊन धान्य वाटप करण्यात आले नाही. आता एप्रिल महिन्यातही याच प्रकाराची पुनरावृत्ती होत असल्याचा आरोप आहे. लाभार्थ्यांकडून बायोमेट्रिक प्रक्रिया पूर्ण करून घेतली जात असली तरी धान्य देण्यास टाळाटाळ केली जात आहे.

याबाबत दुकानदाराकडे विचारणा केली असता, पुरवठा विभागाकडून दोन महिन्यांचा धान्यसाठा आल्यावरच वाटप केले जाईल, असे सांगितले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, या उत्तरामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनीही रेशनिंग दुकानाची बाजू घेतल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. मशीन एक तारखेनंतर थंब घेत नाही, त्यामुळे धान्याचा कोटा मिळाल्यावरच वाटप होईल, असे स्पष्टीकरण देण्यात येत असल्याचे नागरिक सांगतात.

विशेष म्हणजे, पंचशील नगर झोपडपट्टीतील मोठ्या प्रमाणावर गरीब लाभार्थी या दुकानावर अवलंबून आहेत. यापूर्वीही अशाच प्रकारे अंगठे घेऊन धान्य न दिल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. त्यामुळे या गैरप्रकाराची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

या प्रकरणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालण्याची गरज व्यक्त होत आहे. याबाबत पुरवठा अधिकारी अश्विनी धनवे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता कोणतीही प्रक्रिया देण्यात आली नाही.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५